# मिरा भाईंदर महानगरपालिका

## माहिती व जनसंपर्क विभाग

सुधारीत प्रेसनोट

**महापालिका आयुक्तांसह अधिकाऱ्यांनी घेतला शालेय विद्यार्थ्यांसोबत खिचडीचा स्वाद**

आयुक्तांच्या निर्देशानुसार मिरा भाईंदर महानगरपालिका मध्ये आज रोजी शालेय विद्यार्थ्यांसोबत सस्नेह भोजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.
या उपक्रमात महापालिकेच्या ३६ शाळा मध्ये शाळेल निहाय सकाळ व दुपारच्या सत्रात मध्ये महापालिका आयुक्तांसह, विविध खात्यांचे अधिकाऱ्यांच्या नेमणूका करण्यात आल्या.
त्यानुसार आज सकाळी ९.३० वा. व दुपारी १.३० वा. अधिकाऱ्यांनी शालेय विद्यार्थ्यांन समवेत सस्नेह भोजन केले. मुलांची बैध्दिक कौशल्याची देखिल चाचपणी केली.

महापालिकेच्या शाळामध्ये मुलांचा सर्वांगिण विकास व्हावा यासाठी विशेष लक्ष देण्यात येत आहे. मुलांचा शारीरिक विकास व खेळात प्राविण्य प्राप्त व्हावे याकरिता नुकत्याच क्रिडा शिक्षकांच्या नेमणूका केल्या आहेत. तसेच सेमी इंग्रजी आणि इयता ९ व १० वी चे वर्ग सुरु करण्यात आले असून त्यासाठी विशेष शिक्षकांची भरती करण्यात आली आहे. मुलांना आधुनिक शिक्षणाची जोड द्यावी याकरिता, डिजिटल वर्ग सुरु केले आहेत.
परंतु शासन व महापालिकाकडून मुलांना पुरविण्यात येणाऱ्या सेवा-सुविधा त्यांचा मुलांना किती प्रमाणात लाभ होत आहे.. तसेच या स्नेहभोजनातून महापालिका अधिकाऱ्यांच्या मनात महापालिकेच्या शाळेतील विद्यार्थ्यां प्रति आपलेपणा निर्माण करणे हा आयुक्तांचा मुख्य हेतू आहे. त्यासाठी स्वत: आयुक्तांनी मुलांच्या पंगतीला बसून स्नेहभोजन केले. त्यावेळी त्यांनी विद्यार्थ्यां सोबत संवाद साधला. अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात विद्यार्थ्यांची कौटुंबिक व आर्थिक परिस्थीत जाणून घेण्याचा प्रयत्न केला. आयुक्तांनी विचारलेल्या प्रश्नांना मुलांनी देखिल मनमोकळे पणाने उत्तरे दिली.

सस्नेह भोजन झाल्यानंतर मुलांचा बौध्दीक विकास कोणत्या दिशेने चाललेला आहे याचा अंदाज घेतला. गणितीय कौशल्य, भाषिक कौशल्य, मुलांच्या वहया तपासून हस्तांक्षर तपासले. ज्या मुलांची अभ्यासात चांगली प्रगती दिसून आली त्यांचे कौतुक केले. त्यांना प्रोत्साहित केले.

महापालिकेच्या मुलांचा शैक्षणिक दर्जा वाढवा म्हणून जी मुले अभ्यासात मागे पडलेले आहेत त्यांच्यासाठी सायंकाळी शाळा सुटल्यानंतर विशेष वर्ग सुरु करणे तसेच मनपा शाळेत शिक्षण घेणारी मुले ही दुर्बल घटकातील असल्याने त्यांना अभ्यासाठी चांगले वातावरण घरी उपलब्ध होत नाही त्यामुलांसाठी शाळेतच अभ्यासिका सुरु करण्याचा मानस असल्याचे आयुक्तांनी सांगितले. तसेच मुलांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी मनपा शाळांचे वार्षिक स्नेहसंमेलन नाटयगृहात आयोजित करण्याचे शिक्षणाधिकारी यांना निर्देश दिले.

पोषण आहार व विद्यार्थ्यांच्या बैध्दीक विकासाबाबत आज महापालिकेच्या अधिकाऱ्यानी समाधान व्यक्त केले. ज्या काही त्रुटी आहेत त्यावर काम करुन त्या लवकरात लवकर दुर करुन महापालिका शालेय शिक्षणाचा दर्जा वाढविण्यासाठी अशा प्रकारच्या सस्नेहभोजनाचा उपक्रम यापुढे ही राबविला जाईल असे आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांनी या प्रसंगी सांगितले.